# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय -** **अहमदनगर जिल्हयात कोव्हीड19 प्रतिबंधात्मक उपाययोजनाकामी अधिकारी/कर्मचारी यांनी मुख्यालय न सोडणेबाबत.**

**वाचावे -** 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005
2. साथ रोग अधिनियम, 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना/ 2020/ प्र.क्र. 58/ आरोग्य 5, दि.14/03/2020

क्र.आव्यमपु/कार्या 19अ/ 315 /2021 **आदेश** अहमदनगर दिनांक- 3 /04/2021

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम 1897 कलम 2 (1) नुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांना अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्रात कोवीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी कोव्हीड 19चे नियंत्रणाचे दृष्टीने उपाययोजनांचे नियोजन, समन्वयन आणि अंमलबजावणी करणेसाठी तातडीने अधिकारी/कर्मचारी यांची गरज भासू शकते. तसेच कोरोना आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यकतेनुसार अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध होणेकामी सर्वांनी मुख्यालयी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर साथरोग अधिनियम (1) 2 कलम 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेकामी तसेच आपत्कालीन यंत्रणांना आवश्यकतेनुसार मदतीस उपलब्ध राहणेकामी **जिल्हयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे मुख्यालयाचे ठिकाणी उपस्थित राहणेबाबत आदेशित करीत आहे. कोणीही जिल्हाधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये.**

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते साथरोग अधिनियम 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतूदीनूसार भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

**स्वाक्षरी/-**
**(डॉ. राजेन्द्र ब. भोसले)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

**प्रती - सर्व विभाग प्रमुख, अहमदनगर जिल्हा.**

2/- उपरोक्त आदेशानुसार आपले अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सूचित करण्यात यावे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही अधिका-याची रजा मंजूर करू नये.

**(संदीप निचित)**
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**अहमदनगर**